## (6) राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना

पात्रतेचे निकष, अटी व शर्ती दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील 18 ते 59 वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा पुरुष अथवा स्त्री अपघाती अथवा नैसर्गीक मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबास एक रकमी रु. 20,000/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते. मुत्युच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| 1 | वय — 18 ते 59 ची व्यक्ती |
| 2 | कुटुंबाचे उत्पन्न - कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे. तसेच गुण 20 च्या आत असणे आवश्यक आहे. |
| 3 | पात्रतेचीअर्हता - दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असणे आवश्यक पती / पतीचे निधन झाल्याबद्दल संबंधित ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिकेच्या मृत्यूनोंदवहीतील उतारा सादर करणे आवश्यक राहील. |
| 4 | वयाचा दाखला-<br>1)ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत किंवा शाळा सोडल्याचा दाखला, किंवा शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा आधार कार्ड इ. यापैकी एक पुरावा ग्राह्य धरण्यात यावा. सदर पुरावे उपलब्ध नसल्यास ग्रामीण/नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिकारी किंवा त्यापेक्षा वरीष्ठ दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा.<br>2) वैद्यकिय प्रमाणपत्राच्या आधारे नमूद केलेले वय व सकृतदर्शनी दिसणारे वय यामध्ये तफावत नसेल यांची दक्षता घ्यावी. त्याप्रमाणे सर्वच वयाच्या दाखल्यावर वैद्यकिय अधिकाऱ्याचे नांव, त्यांचा नोंदणी क्रमांक व या दाखल्याला कोणत्या वैद्यकिय मंडळासमोर आव्हान देता येईल याची नोंद वैद्यकिय प्रमाणपत्रात नमूद करणे आवश्यक आहे. |
| 5 | उत्पन्नाचादाखला-दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा. |
| 6 | रहिवाशीदाखला - ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| 7 | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| 8 | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |